यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

ज्ञानगंगा घरोघरी

अंतर्गत संज्ञापन पत्र

प्रेषक: सहायक कुलसचिव, नोंदणी कक्ष **धारिका: नोंदणी / प्रोफाईल दुरुस्ती / २०१८-१९.**

प्रति: मा. कुलगुरु **दिनांक: २१/०९ /२०१८.**

विषय: शिक्षणक्रम पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची प्रोफाईल अद्यावत करणे आणि सुधारित निकाल देणेबाबत.....

उद्दिष्ट: मान्यतेस्तव

महोदय,

आपल्या विद्यापीठातून शिक्षण पूर्ण करुन किमान एक वर्ष व त्याहून अधिक कालावधी उलटून गेल्यावर विद्यार्थ्यांकडून त्यांचा नोंदणी तपशिल (Registration Data-Profile) अद्ययावत करुन मिळण्याची आणि त्याआधारे सुधारीत गुणपत्रके व प्रमाणपत्र मिळण्याची मागणी सातत्याने होत असते. यामध्ये नाव/ पत्ता/ केंद्र/विषय बदल किंवा दुरुस्ती या बाबींचा समावेश असतो. याहून अधिक महत्वाची व बऱ्याच अंशी शंकास्पद बाब म्हणजे निकालपत्रकांवरील छायाचित्र व स्वाक्षरी बदलून सुधारित निकालपत्रके मिळण्याची मागणी केली जात आहे. अशा प्रकरणांची संख्या कमी असली तरी त्यातील धोक्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही.

सन-२००८-०९ पूर्वी संपूर्ण राज्यातून प्रवेश अर्ज विद्यापीठ मुख्यालयात नोंदणी कक्षाकडे जमा होत असत आणि नोंदणी कक्ष सदर अर्जाची संगणकीय नोंद (Data Entry) करीत असे: सन-२००८ नंतर हे संगणकीय नोंदणीचे काम बाहेरील एजन्सीकडे सोपविले गेले. त्यानंतर सन-२०१६-१७ पासून पूर्णपणे ऑनलाइन प्रवेश सुरु झाले.

नोंदणी तपशिल **(Registration Data–Profile)** दुरुस्त/ अद्ययावत करण्याचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे.

३.१ **नाव बदल/दुरुस्ती:** यामध्ये विद्यार्थ्यांचे स्वत:चे नाव/ वडिलांचे नाव, आडनाव आणि आईचे नाव यात शुद्धलेखनाची किंवा स्पेलिंगची दुरुस्ती करावयाची असते किंवा एक नाव बदलून वेगळे नाव नोंदवायचे असते. कधी–कधी नावाचा क्रम चुकलेला असतो. म्हणजे विद्यार्थ्यांच्या स्वत:च्या नावाच्या ठिकाणी आईचे किंवा वडिलांचे नाव टाईप झालेले असते. अशा सर्व चुका सुधारुन विद्यार्थ्यांचे अचूक नावाची नोंद आपल्या रेकॉर्डला करावयाची असते. यासाठी विद्यार्थांचा शाळा सोडल्याचा दाखला, १०वी/१२ वीचे प्रमाणपत्र यावर नोंदविलेले नाव प्रमाण मानले जाते व त्या नुसारच आपल्या रेकॉर्डमध्ये नोंद केली जाते.

३.२ **पत्ता बदल/दुरुस्ती :** विद्यार्थ्याच्या पत्यामध्ये चुकीचे स्पेलिंग/ अशुद्धलेखन असते. तर काही वेळा विद्यार्थी निवासबदल/ नोकरी–व्यवसाय किंवा इतर काही कारणास्तव त्याचा स्वत:चा पत्ता बदलण्याची किंवा दुरुस्त करण्याची मागणी करतो. त्यानुसार आपण बदल/दुरुस्ती करुन त्याची प्रोफाइल अद्ययावत करतो.

३.३ **विषय बदल/दुरुस्ती:** प्रवेश अर्ज भरताना चुकीचे विषय निवडले गेले असतील, किंवा विद्यार्थ्याच्या स्वत:च्या इच्छेने विषय बदल करुन हवा असेल तर विद्यार्थ्याच्या रितसर अर्जानुसार विषय बदल/दुरुस्ती करण्यात येते.

मा. कुलगुरू कार्यालय
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्रं. : VC/8531
दि. 21/ 9 /२०१8

३.४ **केंद्र बदल:** चुकीचे केंद्र निवडले गेल्यामुळे, नोकरी-धंदयामुळे, तसेच अविवाहित विद्यार्थींनींच्या बाबतीत विवाहानंतर सासरी जावे लागल्यामुळे केंद्र बदलाची/ दुरुस्तीची गरज भासते. त्यासाठी विद्याथ्यांने विहित शुल्कासह रितसर अर्ज सादर केल्यावर केंद्र बदलून दिले जाते.

३.५ **शुल्क आकारणी :** वरील ३.१ ते ३.४ मधील बदल/ दुरुस्त्या करण्यासाठी सध्या प्रकरण निहाय प्रत्येक बाबीसाठी किंवा एकत्रितपणे रु.३००/- इतके शुल्क वि.से.विभागाकडून (नोंदणी कक्ष) आकारण्यात येते. याशिवाय नाव, विषय बदलून सुधारीत गुणपत्रके व पदवी प्रमाणपत्र पाहिजे असल्यास प्रति गुणपत्रक शंभर रुपये आणि पदवी प्रमाणपत्रास तीनशे रुपये असे शुल्क परीक्षा विभागाकडून आकारण्यात येते.

३.६ नाव/पत्ता/विषय/केंद्र यातील बदल अथवा दुरूस्ती ही नियमित बाब आहे. यामध्ये गैरप्रकाराची शक्यंता जवळजवळ नसतेच.

४. **छायाचित्र व स्वाक्षरी बदल करणे:** सन-२००८-०९ ते २०१४-१५ या काळात विद्यार्थ्यांकडून मॅन्युअल फॉर्म (अर्ज) भरून घेतले जात व त्यानंतर त्यांची विभागीय केंद्रात डेटा एंट्री केली जात असे. याच कालावधीत विद्यार्थ्यांच्या प्रोफाईलमध्ये प्रचंड चुका झाल्याचे दिसून येत आहे. प्रोफाइल अपडेशनसाठी याच काळातील प्रकरणे मोठया प्रमाणावर येत आहेत. यामध्ये एका विध्यार्थाचा फोटो व स्वाक्षरी दुसऱ्याच्या अर्जावर जाणे, मुलाच्या अर्जावर मुलीचा आणि मुलीच्या अर्जावर मुलाचा फोटो स्कॅन होणे अशा चुका झालेल्या आहेत. या चुका प्रामुख्याने डेटा एंट्री ऑपरेटरकडून झालेल्या आहेत. विद्यार्थी प्रवेश अर्जासोबत टाचणीने फोटो लावून देत. अभ्यासकेंद्र ते विभागीयकेंद्र या प्रवासात फोटो गळून पडत. त्यामुळे याचा फोटो त्याला असे प्रकार डेटा एंट्री ऑपरेटरकडून झालेले आहेत. यातून विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले आहे. तसेच यातून शंका अशी उपस्थित होऊ लागली की परीक्षा नक्की कोणी दिली? प्रवेश अर्जावर/ निकालपत्रावर ज्याचा फोटो आहे त्याने की नंतर निकाल दुरुस्त करुन मागतो त्याने? त्यामुळे सध्या परीक्षा विभाग असे निकाल सुधारून देण्यास तोंडी नकार कळवित आहे.

५. यामध्ये विशेष महत्वाचा मुद्दा असा की विद्यार्थी शिक्षण पूर्ण झाल्यावर एक ते दहा वर्षांनी प्रोफ़ाइल बदलाची व त्या आधारे सुधारित निकालाची मागणी करीत आहेत.सद्य:परिस्थितीत अशाप्रकारे प्रोफ़ाइल बदलण्यासाठी व सुधारीत निकाल देण्यासाठी शिक्षणक्रम पूर्ण झाल्यावर किमान किती काळानंतर अर्ज करता येईल याबाबत कुठलेही नियम, मार्गदर्शक सूचना उपलब्ध नाहीत. मात्र परीक्षा विभागाकडून असे जुने रेकॉर्ड बदलून सुधारित निकाल देण्यास तोंडी नकार देण्यात येत आहे.

मात्र अशी काही प्रकरणे प्रत्यक्ष घडली आहेत किंवा कसे याबाबत परीक्षा विभागाने आजपर्यंत कुठलीही माहिती कळविलेली नाही. याबाबत काही पाहणी/ सर्वेक्षण झाले आहे का? लेखी तक्रारी प्राप्त झाल्या आहेत का? त्यानुसार काही चौकशी होऊन कारवाई झाली आहे का? याबाबतही परीक्षा विभागाकडून काही माहिती मिळालेली नाही. मात्र यासंदर्भातील विद्यार्थ्यांचे अर्ज स्वीकारू नयेत. अशा मौखिक सूचना देण्यात येत आहे. त्यामुळे नोंदणी कक्षाकडे आलेली फोटो व स्वाक्षरी बदलाची प्रकरणे प्रलंबित आहेत.

६. विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरु असतांनाच त्याने प्रोफ़ाइल बदलाची/ दुरुस्तीची मागणी केल्यास असे बदल/दुरुस्ती करणे नैसर्गिकंन्यायाचे ठरते. त्यानुसार त्यास ठराविक शुल्क आकारून व पुरावे पाहून बदल/दुरुस्त्या करुन दिल्या जातात. मात्र आपल्याकडील शिक्षणक्रम पूर्ण होऊन मोठया कालावधीनंतर प्रोफ़ाइल बदलाची व त्या आधारे सुधारित निकालाची मागणी आल्यास नेमके काय करावे? मागणी मान्य करावयाची असल्यास त्यासाठी नेमकी काय प्रक्रिया अवलंबावी? शुल्क किती आकारावे? याबाबत स्वयंस्पष्ट नियमावली, निकष, मार्गदर्शक सूंचना

तयार करणे अत्यावश्यक वाटते. आजमितीला अशी नियमावली उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांची या विषयीची प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे.

७. सदरची वस्तुस्थिती लक्षात घेऊन यावर कायमस्वरूपी उपाययोजना तयार करण्यासाठी मा. संचालक, वि.से.विभाग यांचे अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्याचे प्रस्तावित करीत आहोत.

१. संचालक, वि.से.विभाग –अध्यक्ष
२. संचालक, मानव्य विद्याशाखा- सदस्य
३. संचालक, संगणक शिक्षण विद्याशाखा
४. परीक्षा नियंत्रक – सदस्य
५. सहायक कुलसचिव, नोंदणी कक्ष – सचिव

८. या समितीने उपरोक्त मुद्यांचा विचार करून निश्चित असे निकष / नियम ठरवून देणे अपेक्षित आहे. हे नियम अंतिम मान्यतेस्तव आपणांस सादर करण्यात येतील. आपल्या मान्यतेनंतर सदर निकष/ नियम अंमलात येतील.

प्रस्ताव: वर नमूद केल्यानुसार आपल्या विद्यापीठाचा शिक्षणक्रम पूर्ण करून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांचा Registration Data – Profile बदलण्याकरिता / दुरुस्त करण्याकरिता व त्यानुसार सुधारित निकाल देण्याकरिता निकष / नियम ठरविण्यासाठी वरीलप्रमाणे समिती गठीत करून पुढील कार्यवाही करण्यास मान्यता मिळावी ही विनंती.

Sonak 21/9/18

(तु.का.सोनवणे)
सहायक कुलसचिव
नोंदणी कक्ष

मार्फत सादर:

20/9/18

१. **मा.संचालक,वि.से.विभाग**

२. **मा. परीक्षा नियंत्रक**

Kalyanam

मा. कुलगुरु